## कृषी सल्ला : राहुरी विभाग

### गहू, कांदा

- काढणी
- पावसाची शक्यता असल्याने गहू आणि कांदा पिकाची कापणी, काढणी त्वरित पूर्ण करून घ्यावी. काढलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

### धान्य साठवणूक

- पावसाची शक्यता असल्याने साठवण करावयाच्या कडधान्यांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी एरंडेल, जवस, करंज किंवा कडूनिंबाचे तेल यांचा ३ ते ५ मिलि प्रति किलो धान्य या प्रमाणात वापर करावा.
- साठवणीच्या धान्यात किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. किडींपासून धान्याचे संरक्षण करण्यासाठी, कापणी केलेल्या धान्यामध्ये ११ ते १२ टक्के, कडधान्ये ९ टक्के, तेलबिया ८ टक्के आणि भाजीपाला बियाणे ५ ते ६ टक्के इतका ओलावा राहील, अशा पद्धतीने बियाणे वाळवावे.

### भाजीपाला पिके

- जोराच्या वाऱ्यासह होणाऱ्या पावसाची शक्यता असल्याने वेलवर्गीय भाजीपाला पिकांना आधार द्यावा. जेणेकरून वारा आणि पावसामुळे त्यांचे नुकसान टाळले जाईल. शक्य असल्यास उघड्यावर असलेली रोपवाटिका प्लास्टिक पेपरने झाकून घ्यावी.

### फळबाग

- नवीन लागवड केलेल्या फळबागेतील कलमांना काठीचा आधार द्यावा. जेणेकरून वारा आणि गारपिटीमुळे कलमे पडणार नाहीत.
- कलमांच्या बुंध्यात गवत, पालापाचोळा यांचे सेंद्रिय आच्छादन करावे. त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी होईल.
- नियमित अंतराने फळपिकांच्या गरजेनुसार ठिबकद्वारे सिंचन करावे. पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

### पशुसंवर्धन

- गोठ्यात जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ, थंड पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध करावे. पाण्याच्या टाक्यांचा नियमित स्वच्छता राखावी.
- गोठ्याचे छप्पराची डागडुजी करून घ्यावी. जेणेकरून गारपिटीमुळे गोठ्यातील जनावरांना इजा होणार नाही.
- गोठ्याच्या छतावर नारळाच्या झावळ्या टाकाव्यात. गोठ्याच्या बाजूने पडदे सोडून त्यावर पाणी सोडावे.
- शक्य असल्यास गोठ्यात फॉगर लावावेत. जेणेकरून गोठ्यातील वातावरण थंड राहून जनावरांना शारीरिक तापमान नियंत्रित करण्यासाठी अतिरिक्त ऊर्जा खर्च करावी लागणार नाही.

०२४२६-२४३२३९
(ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि कृषी विद्या विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)